# <u>ऋणनिर्देश</u>

"स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय संसदेतील स्त्रियांचे प्रतिनिधित्व आणि भूमिका" या माझ्या लघुशोध प्रबंधाच्या मार्गदर्शिका आदरणीय **डॉ. श्रीमती व्ही. पी. रासम** यांचे मला बहुमोल मार्गदर्शन सतत लाभलेले आहे. त्यांची मी सदैव ऋणी आहे. आमचे मिरज महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रकाश पाटील यांचे मला प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभलेले आहे. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीनारायण, डॉ. के. के. कावळेकर, डॉ. ए. एस. चौसाळकर, सौ. भारती पाटील, डॉ. मेधा नानिवडेकर यांचे मला नेहमीच सहकार्य लाभलेले आहे. या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

ती. सौ. आई आणि ती. दादा यांच्या प्रेरणेतूनच मी हे कार्य करू शकले. बंधू मधुसूदन आणि भगिनी अश्विनी व स्वरूपा यांच्याकडून मला प्रेरणा आणि सहकार्य लाभले. ग्रंथपाल श्री. विजय तिबिले यांचेही मला सहकार्य लाभले. श्री. मिलींद भोसले यांचे टंकलेखनाचे कार्य उत्कृष्ट झालेले आहे. मी या सर्वांची ऋणी आहे.

**कु. उर्मिला बी. पाटील.**